# 'ससूनच्या धर्तीवर प्रकल्प राबवावेत'

**पुणे :** ससून हॉस्पिटलमध्ये सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उभारलेला नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (एनआयसीयू) प्रकल्पाच्या धर्तीवर राज्यातील इतर सरकारी मेडिकल कॉलेजांमध्ये असे प्रकल्प राबविण्याची सूचना सर्व अधिष्ठातांना देण्यात येतील, असे राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी रविवारी सांगितले.

फिनोलेक्स प्रायव्हेट लिमिटेडशी संलग्न मुकुल माधव फाउंडेशन, श्रीमंत गणपती हलवाई गणपती ट्रस्ट, कमिन्स इंडिया, सिसका एलईडी, सुझलॉन एनर्जी, या कंपन्यांनी दिलेल्या देणगीतून ससून हॉस्पिटलमध्ये 'एनआयसीयू' उभारण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण महाजन यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. महापौर मुक्ता टिळक, पालकमंत्री गिरीश बापट, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, खासदार अनिल शिरोळे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे, मुकूल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय संचालक रितू छाब्रिया, फिनोलेक्स उद्योगाचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, बी. जे. मेकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले आणि



वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय तावरे या वेळी उपस्थित होते. या प्रकल्पासाठी अकरा कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला.

'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी अंतर्गत आरोग्य क्षेत्रासाठी निधी द्यावा, त्यातून पेशंटना सरकारी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत सुविधा मिळू शकतात. तसेच, समाजातील दानशूर व्यक्तींनी आरोग्य सेवेला मदत करण्यासाठी प्राधान्य द्यावे,' असे आवाहन महाजन यांनी कले. ''ससून पॅटर्न' राज्यभरात सर्वत्र वापरला पाहिजे. येथे गरीब पेशंटला केंद्रबिंदू मानून डॉक्टर सेवा देतात,' असे बापट म्हणाले. 'ससून हॉस्पिटल कार्यपद्धतीवर टीका करताना सकारात्मक बाबी समोर आणण्याचा अभ्यागत मंडळाच्या माध्यमातून नेहमीच उद्देश राहिला आहे,' असे शिरोळे यांनी सांगितले. 'मध्यमवर्गीयांसाठी सेवा सक्षम करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. येथे येणाऱ्या पेशंटला चांगल्या सेवा देणे हा उद्देश आहे,' असे डॉ. चंदनवाले म्हणाले. सूत्रसंचालन महेश सूर्यवंशी यांनी केले.